# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः10.12.2024** **वारःमंगळवार**

1. परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात अव्वल असल्याचं राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांचं प्रतिपादन
2. विधानसभेच्या अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड
3. विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन येत्या 16 डिसेंबरपासून नागपूरमध्ये
4. राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांसाठी स्वतंत्र वॉररूम सुरु करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश
5. 2022-23 या वर्षासाठीच्या राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांची घोषणा; महाराष्ट्राला सहा पुरस्कार आणि
6. मुंबईत कुर्ला इथं बेस्ट बस अपघातात तिघांचा मृत्यू; वीस जखमी

**राज्यपाल**

गेल्या आर्थिक वर्षामध्ये थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात प्रथम स्थानी होता, असं राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. राज्य विधान मंडळाच्या विशेष अधिवेशनामध्ये राज्यपालांनी काल विधीमंडळाच्या संयुक्त सभागृहाला संबोधित केलं. सध्याच्या 2024-25 या आर्थिक वर्षात एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीतही 1 लाख 13 हजार 236 कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणुक महाराष्ट्रात झाली आहे. ही गुंतवणूक, गेल्या वर्षाच्या थेट परकीय गुंतवणुकीच्या 90 टक्क्यांपेक्षा अधिक असल्याचं राज्यपाल म्हणाले. समाजातल्या विविध घटकांसाठी राज्य सरकार राबवत असलेल्या योजना, पायाभूत सुविधांचे प्रकल्प अशा विविध मुद्दयाचा आढावा राज्यपालांनी आपल्या भाषणात घेतला.

**नार्वेकर**

राज्य विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनात काल विधानसभा सदस्य ॲड. राहुल नार्वेकर यांची विधानसभेच्या अध्यक्षपदी आवाजी मतदानानं निवड करण्यात आली. हंगामी विधानसभा अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी ॲड. राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाल्याचं जाहीर केलं. नार्वेकर यांच्या निवडीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्यासह सर्वपक्षीय सदस्यांनी नार्वेकर यांचं अभिनंदन केलं. शिस्तशीर आणि वक्तशीर या लोकप्रतिनिधींना आवश्यक बाबी राहुल नार्वेकर यांच्याकडे आहेत. नार्वेकर यांच्या रूपानं कायद्याचं उत्तम ज्ञान असणारे अध्यक्ष सभागृहाला मिळाले असल्याचे फडणवीस यांनी सांगितलं.

दरम्यान, विधानसभेच्या अध्यक्षपदाची निवडणूक बिनविरोध झाली असली, तरी आता विरोधी पक्षाबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. अधिवेशनात कालच्या दिवशी 4 नवनिर्वाचित सदस्यांना सदस्यपदाची शपथ देण्यात आली. अधिवेशनाच्या या कालावधीत एकंदर 283 सदस्यांना शपथ देण्यात आली.  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारवरील

विश्वासदर्शक ठराव काल विधानसभेत आवाजी मतदानाने मंजूर झाला. उद्योगपती रतन टाटा यांच्यासह दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केल्यानंतर विधानसभेचं कामकाज संस्थगित करण्यात आलं.

**विधीमंडळ**

बेळगावच्या मराठी बांधवांवर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध राज्य सरकार एकमतानं आणि सर्व शक्तीनिशी सीमाभागातल्या बांधवांच्या पाठीशी उभं आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानपरिषदेत दिली. तर सीमा भागातल्या मराठी भाषकांना विरोध करण्याची कर्नाटक सरकारची भूमिका अन्यायकारक असल्याचे सांगत कर्नाटक सरकारचा निषेध करत असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. यासंदर्भात विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

**संस्थगित**

विधानपरिषदेच्या विशेष अधिवेशनाचं कामकाज काल संस्थगित करण्यात आलं. विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन येत्या 16 डिसेंबरपासून नागपूरमध्ये होणार असल्याची घोषणा उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली.

**फडणवीस**

पायाभूत सुविधांप्रमाणेच राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांसाठीही स्वतंत्र वॉररूम सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सचिव स्तरावरील बैठकीत दिले. महाराष्ट्र हे अमर्याद ताकदीचं राज्य असून थांबू नका, असा मंत्र फडणवीस यांनी दिला आणि सरकारच्या आगामी काळातील वाटचालीची दिशा स्पष्ट केली. पारदर्शकता, गतिशीलता आणि प्रामाणिकता यावर अधिक भर द्या असं त्यांनी सांगितलं. जिल्ह्यांच्या पालक सचिवांनी आपापल्या जिल्ह्यांचे तातडीने दौरे सुरु करावेत. प्रत्येक विभागानं शंभर दिवसांचा कार्यक्रम तयार करून तो सादर करावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

**संसद**

अदानी लाचखोरी प्रकरणासह विविध मुद्द्यांवरून कालही संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**स्मार्ट इंडिया हॅकेथॉन**

स्मार्ट इंडिया हॅकेथॉनच्या अंतिम फेरीत सहभागी होत असलेल्या युवा पिढीशी पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या दूरस्थ माध्यमातून संवाद साधणार आहेत. या स्पर्धेत 13शे हून अधिक विद्यार्थी संघ सहभागी होतील. मुंबई पुण्यासाह देशातल्या 51 केंद्रांवर ही स्पर्धा होणार आहे. पुण्याच्या एमआयटी विद्यापीठामध्ये स्मार्ट इंडिया हॅकेथॉन स्पर्धेच्या हार्डवेअर गटाची अंतिम फेरी होणार आहे.

**संजय मल्होत्रा**

रिझर्व्ह बँकेचे नवे गव्हर्नर म्हणून संजय मल्होत्रा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. 1990 च्या तुकडीचे अधिकारी असलेले मल्होत्रा सध्या अर्थ मंत्रालयात महसूल सचिव म्हणून कार्यरत आहेत. मल्होत्रा हे उद्या मावळते गव्हर्नर शक्तीकांत दास यांच्याकडून सूत्रं हाती घेणार असून त्यांचा कार्यकाळ 3 वर्षांचा असेल.

**पुरस्कार**

केंद्रीय पंचायत राज मंत्रालयानं 2022-23 या वर्षासाठीच्या राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांची घोषणा नुकतीच केली; त्यात महाराष्ट्राला 6 पुरस्कार मिळाले आहेत. सातारा जिल्ह्यातल्या पाटण तालुक्यातल्या मान्याची वाडी ग्रामपंचायतीनं नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत शाश्वत विकास पुरस्कार श्रेणीत सर्वोत्तम ग्राम पंचायत पुरस्कार, तसंच ग्राम उर्जा स्वराज विशेष ग्रामपंचायत अशा दोन पुरस्कारांवर आपलं नाव कोरलं. तर गोंदिया जिल्ह्यातल्या तिरोडा पंचायत गटाला नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत शाश्वत विकास पुरस्कार श्रेणीत सर्वोत्तम पंचायत गट हा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. नाशिक जिल्ह्यातली मोडाळे ग्रामपंचायत, भंडारा जिल्ह्यातली बेला ग्रामपंचायत, तसंच पुण्यातल्या यशदा, अर्थात यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी या संस्थेला विविध श्रेणीत पुरस्कार जाहीर झाले आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उद्या दिल्लीत हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**मॅरेथॉन-अहिल्यानगर**

16 डिसेंबर रोजी साजरा होणारा विजय दिन आणि 15 जानेवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या लष्कर दिनाच्या औचित्यानं सुरू झालेली विजय दिन अल्ट्रा मॅरेथॉन अहिल्यानगर जिल्ह्यात पोहोचली असून जिल्ह्यातील हिवरे बाजार इथून ही तुकडी अहिल्यानगरकडे धावणार आहे. नगरच्या भुईकोट किल्ल्यावर याचा समारोप होणार आहे. ऐकुया याबाबत अधिक वृत्तांत....

**लष्कर दिन आणि विजय दिन या दोन्हींचे औचित्य साधून पुण्यातील लष्कराच्या दक्षिण मुख्यालयानं या विजय दिन अल्ट्रा मॅरेथॉनचं आयोजन केलं आहे. मुंबईमधून सहा डिसेंबर रोजी सुरू झालेली ही मॅरेथॉन नाशिक, अहिल्यानगर, कोल्हापूर असा प्रवास करून पुण्यात पोहोचणार आहे. यात 15 धावपटूंनी सहभाग घेतला असून कर्नल मनदीप सिंग मान आणि पूजा मेहरा हे निवृत्त लष्करी अधिकारी या मॅरेथॉनचं नेतृत्व करत आहेत. यामध्ये सहा निवृत्त अधिकारी आणि नऊ नागरिक आणि एनसीसीचे विद्यार्थीही सहभागी झाले आहेत. आज सकाळी हिवरे बाजार इथ पद्मश्री पोपटराव पवार यांनी या अल्ट्रा मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. पन्नास किलोमीटरचा प्रवास करून अहिल्यानगर शहरातील भुईकोट किल्ल्याजवळ धावपटू पोहोचतील. उद्या म्हणजे 11 डिसेंबर रोजी रोजी ही मॅरेथॉन कोल्हापूरकडे रवाना होणार आहे. समर्थ भारत सक्षम सेना असं ब्रीद वाक्य घेऊन धावणाऱ्या धावपटूंमध्ये नारीशक्तीचा सहभागही उल्लेखनीय आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी मनोज सातपुते अहिल्यानगर.**

**कर्णेश्वर-रत्नागिरी**

रत्नागिरी जिल्ह्यात कसबा इथं तिसरा कर्णेश्वर कला-संगीत महोत्सव नुकताच पार पडला. चालुक्यकालीन कर्णेश्वर मंदिराच्या प्रांगणात झालेल्या या महोत्सवात दिग्गज कलाकारांनी केलेल्या सादरीकरणानं रसिक मंत्रमुग्ध झाले.

**साहित्य संमेलन-बीड**

बीड जिल्ह्यातल्या अंबाजोगाई इथं 14 आणि 15 डिसेंबर रोजी होणाऱ्या 11व्या मराठी साहित्य संमेलनाची तयारी पूर्ण झाल्याची माहिती स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांनी पत्रकारांना दिली. मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीनं हे संमेलन होत आहे.

**<u>निधन-मुंबई</u>**

सांगली जिल्ह्यातल्या अंकलखोप इथले ज्येष्ठ लोककलावंत शाहीर आनंदराव सूर्यवंशी यांचं रविवारी निधन झालं. ते 101 वर्षांचे होते. आकाशवाणीच्या सांगली केंद्राचे ते मान्यताप्राप्त कलाकार होते. राज्य शासनाच्या सांस्कृतिक विभागातर्फे त्यांनी लोककला सादर केल्या होत्या. जिल्हा नशाबंदी संघटक म्हणून त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना शासनानं व्यसनमुक्ती पुरस्कार दिला होता.

**<u>बेस्ट-अपघात</u>**

मुंबईत कुर्ला इथं बेस्ट बसनं अनेक वाहनं आणि पादचाऱ्यांना धडक दिल्यानं काल रात्री झालेल्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला तर किमान वीस जण जखमी झाले. अपघाताचं कारण अजून स्पष्ट झालं नसून जखमींवर उपचार सुरू आहेत.

**<u>हवामान-थंडी</u>**

राज्याच्या काही भागात किमान तापमानात लक्षणीय घट झाली असून पुन्हा एकदा थंडी जाणवू लागली आहे. नाशिकमध्ये निफाड इथं काल पारा 6 अंशांवर उतरल्याचं वृत्त आहे. येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार